—: प्रेस नोट :— दिनांकः—०१/०७/२०२४

**रफि अहमद किडवाई मार्ग पोलीस ठाणेने सुमारे ३१ वर्षापुर्वी बेकायदेशिर जमाव जमवून जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करणे ( मुंबई दंगल १९९३) या गुन्हयातील फरार असलेल्या गुन्हेगारास ईस्माईल बिल्डींग, दगडी मस्जिद जवळ, शिवडी मुंबई येथून फेरअटक केली.**

र.अ.कि. मार्ग, पो.ठाणे, गु.र.क्र. १३/१९९३ कलम १४३,१४४,१४५,१४६,१४७,१४८,१४९,३०७,३४ भादंवि सत्र न्यायालयीन खटला क्र. १९७/१९९५ मधील तत्कालीन अटक आरोपी सय्यद नादीर शहा अब्बास खान तेव्हाचे वय ३१ वर्षे रा.ठी. रूम नं.०२, ईस्माइल बिल्डींग, दुसरा माळा, सखाराम लांजेकर मार्ग, शिवडी मुंबई १५. हा अटकेपश्चात न्यायालयात हजर राहत नसल्याने त्याचे विरोधात स्थित अजामीनपात्र वॉरंट जारी करून, त्यास मा. सत्र न्यायालयात कोर्ट रूम नं २३, यांनी फरार घोषित केले होते.

**फरार आरोपी नामे— सय्यद नादीर शहा अब्बास खान वय ६५ वर्षे, धंदा. चालक,** रा.ठी. रूम नं.०२, ईस्माइल बिल्डींग, दुसरा माळा, सखाराम लांजेकर मार्ग, शिवडी मुंबई १५ याच्या राहत्या घरी जाउन वारंवार चौकशी केली असता त्याच्या कुटूबातील सदस्य त्याच्याबाबत कोणतीही आम्हाला माहीती नसल्याचे सांगून टाळाटाळ करत असल्याने नमूद फारार आरोपीबाबत कोणतीही माहीती उपलब्ध होत नव्हती. तद्अनुषंगाने नमूद फरार आरोपीच्या कुटूंबाचे मोबाईल क्रमांकाचे प्राप्त करून त्या मोबाईल क्रमांकाचे मा.पोलीस उपआयक्त परिमंडळ—४ यांच्या मार्फतीने सीडीआर प्राप्त करून त्याचे तांत्रिक विश्लेशण केले. तसेच दिनांक २९/०६/२०२४ रोजी प्राप्त गुप्त बातमीदारामार्फत माहीती मिळाली कि, नमूदचा फरार आरोपी हा त्याच्या राहत्या पत्यावर येणार आहे. तद्अनुषंगाने मपोउनि/जाधव, पो.ह.क्र.उ.३१५७८/कडलग, पो.ह.क्र.३४१८२/लादे व पो.शि.क्र.१३२०९/मंडलिक हे नमूद फरार आरोपीच्या राहत्या घरी जाउन त्यास सापळा कारवाईद्वारे यशस्विपणे ताब्यात घेवून त्यास दि.२९/०६/२०२४ रोजी १७:१५ वा.चे सुमारास सर्व कायदेशिर सोपास्कार पार पाडून अटक करण्यात आली.

मा. वरीष्ठांच्या आदेशाने बृहन्मुबई पोलीस आयुक्तालयात पाहिजे फरारी अटकेची विशेष मोहिम सध्या सुरू आहे. तद्अनुषगांने मा. पोलीस उप आयुक्त परिमंडळ ०४, श्री. प्रशांत कदम सो, मा. सपोआ / माटुंगा विभाग श्री. संजय जगताप, प्र.वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सतिश पवार सो, पोनि लिलाधर पाटील (पो.नि.गुन्हे), पोनि श्याम बनसोडे(कावसू) यांचेकडून वेळोवळी घेतलेल्या बैठकीदरम्यान मार्गदर्शन केलेले होते.त्या अनुषंगाने म.पो.उ.नि.पल्लवी जाधव,पो.ह.सुरेश कडलग, पो.ह.अशोक लादे, पो.शि.मधूकर मंडलिक व पो.ह.निकम, पो.शि.दळवी, म.पो.शि. यादव(तांत्रिक मदत व कागदपत्रांचे अवलोकन) या पथकाने ३१ वर्षे फरार असलेल्या आरोपीतास शिताफीने फेर अटक करून कौशल्यपुर्ण व तांत्रिक पध्दतीने तपास केला आहे.

-1/7/24

( सतिश पवार )
प्र.वरिष्ठ पोलीस निरीक्षक
र.अ.कि.मार्ग पोलीस ठाणे, मुंबई

Scanned with CamScanner